**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 011.03.2025** **वार- मंगळवार**

---

**बलिदानदिन**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त आज ठीकठिकाणी आदरांजली वाहण्यात आली. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानभवनात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**उसगाळप**

पुणे जिल्ह्यात 2024-25 मध्ये एकंदर 1 कोटी 49 लाख मेट्रिक टन उसाच्या गाळपाचा अंदाज आहे. त्यापैकी सद्य:स्थितीत जिल्ह्यातील 14 साखर कारखान्यांनी उसाचे गाळप पूर्ण केले असून 96 लाख 52 हजार 644 क्विंटल साखर उत्पादन केलं आहे. ऊस संपल्याने इंदापूर तालुक्यातील कर्मयोगी आणि निरा- भीमा सहकारी साखर कारखाने बंद झाले आहेत. सर्वाधिक ऊसगाळप आणि साखर उत्पादनात इंदापूरमधील बारामती ॲग्रो या कारखान्याने सर्वाधिक 13 लाख 61 हजार क्विंटल साखरेचे उत्पादन केलं आहे.

**पगडीबीज**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीजनिमित्त पाच फूट उंच आणि ३० फुटांचा घेर असलेली पगडी तुकोबाचरणी अर्पण करण्यात आली.दिलीप सोनिगरा या व्यावसायिकांनी तुकोबांच्या मंदिरात पगडी भेट दिली आहे. संस्थानाच्या अध्यक्षांसह विश्वस्तदेखील

कार्यक्रमाला उपस्थित होते. भाविकांच्या उपस्थितीत या पगडीच अनावरण झाल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**<u>जीबीएसमदत</u>**

पुणे महापालिकेकडून जीबीएस रुग्णांना आर्थिक मदत देण्यात येत आहे. आतापर्यंत १० रुग्णांना प्रत्येकी २ लाखांची मदत देण्यात आली, तर शहरी गरीब योजनेत बसत नसलेल्या २८ रुग्णांना प्रत्येकी १ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. जीबीएसवरील उपचारांसाठी आयव्हीआयजी इंजेक्शन आणि प्लाझ्मा फेरेसिसचे उपचार दिले जात आहेत. या उपचारांसाठी पाच ते आठ लाख रुपये खर्च येतो. जीबीएस रुग्णांना आर्थिक मदत देण्याच्या योजनेला महापालिका आयुक्तांनी यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

**<u>क्लोरीनमशीन</u>**

सिहंगड रोड परिसरात जीबीएस प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर नांदेड गाव , बारांगणी मळा येथील विहिर, खडकवासला जॅकवेल, प्रयेजा सिटी या चार ठिकाणी क्लोरिन मशिन बसविण्यात आले आहेत. त्यासाठी पुणे महापालिकेने ८७ लाख रूपये खर्च केले आहेत. शहरात जीबीएसचे रुग्ण आढळलेल्या नांदेड गावातील जुन्या विहीरीत धरणातून पाइपलाइनद्वारे पाणी सोडले आहे. या परीसरात पुणे महापालिकेतर्फे विनाप्रक्रिया पाण्याचा पुरवठा केला जातो. शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी महापालिकेने हे क्लोरीन मशीन बसवले आहेत.

**<u>पौड फाटा</u>**

बालभारती ते पौड फाटा प्रस्तावित असलेल्या रस्त्याच्या कामाविरोधात नागरी चेतना मंचाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यासंदर्भात न्यायालयाने नुकताच निकाल देत ही याचिका फेटाळून लावली आहे. त्यानंतर या रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी पुणे महापालिकेकडून वन विभागाची परवानगी घेतली जाणार आहे. महापालिकेचे उपायुक्त आणि पथविभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी पत्रकारांना ही माहिती दिली.

**<u>मेट्रोआंदोलन</u>**

पुणे मेट्रो स्थानकात आंदोलन करणाऱ्या नऊ जणांना अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी जे. एस. भाटिया यांनी दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या प्रकरणातील उर्वरित आठ आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. मेट्रो मार्गावर आंदोलन प्रकरणाचा मुख्य सूत्रधार कोण आहे, यादृष्टीने तपास करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली. रोजगार मिळावा या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी रविवारी आंदोलन केलं होतं.

**<u>वीजखंडित</u>**

महावितरणच्या पुणे प्रादेशिक विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांकडे ३१० कोटी ८४ लाख रुपयांची थकबाकी आहे. थकीत वीजबिलाच्या वसुलीसाठी महावितरणकडून एका महिन्यात ५१ हजार ७३५ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.थकबाकीचा भरणा होत नसल्याने वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे महावितरणकडून सांगण्यात आलं आहे..

**<u>आरटीइ</u>**

पुण्यात आर टी इ प्रवेशासाठी बनावट कागदपत्रे जोडणाऱ्या अठरा पालकांविरोधात बावधन पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. पालकांनी आपल्या पाल्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश घेण्यासाठी रहिवासी पुरावा म्हणून बनावट कागदपत्रे सादर केली आहेत. शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी शिक्षण विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<u>लोकशाहीदिन</u>**

पुणे शहर तहसील कार्यालयाच्यावतीने १७ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० ते ५.०० या कालावधीत मुंढवा इथल्या पिंगळे वस्ती या ठिकाणी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. नागरिकांनी लोकशाही दिनाच्या दिवशीच आपल्या समस्याबाबत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याचं आवाहन तहसीलदार सूर्यकांत येवले यांनी केलं आहे.

**क्रीडा**

पुण्यात सुरू असलेल्या फ्रेंडशिप करंडक' क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत रमणबाग फायटर्स संघाने प्रज्योत शिरोडकर आणि प्रसाद घारे याच्या फलंदाजीच्या जोरावर रंगारी रॅायल्स् संघाचा १० गडी राखून पराभव करत अजिंक्यपद पटकावले. विजेत्या रमणबाग फायटर्स संघाला २ लाख ११ हजार रूपये, करंडक आणि उपविजेत्या रंगारी रॅायल्स् संघाला १ लाख ११ हजार रूपये आणि करंडक प्रदान करण्यात आला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 37 तर किमान तापमान 17 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**